# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः09.06.2026** **वारःमंगळवार**

---

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सैन्य आणि पोलीस दलात साहसी कामगिरी बजावलेल्यांना शौर्य पुरस्कार प्रदान
2. देशात इंधन आणि खतांचा पुरेसा साठा असल्याची केंद्र सरकारची माहिती
3. महारेलमार्फत करण्यात येणाऱ्या 65 कामांना मंजुरी
4. राज्यसभेच्या रिक्त जागेच्या पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजेंद्र जैन यांचा अर्ज दाखल
5. अफगाणिस्तानविरुद्धच्या क्रिकेट कसोटी सामन्यात भारताचा 300 धावांनी विजय

**<u>शौर्य पुरस्कार वितरण</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल सैन्य दलं, केंद्रीय सशस्त्र पोलीस दलं तसंच राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या पोलीस दलातील कर्मचाऱ्यांना शौर्य पुरस्कार प्रदान करण्यात आले. राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात 7 कीर्ती चक्र, 15 वीर चक्र आणि 29 शौर्य चक्रं प्रदान केली. लेफ्टनंट कर्नल आदित्य घाटगे आणि पोलीस सेवेतले निरीक्षक रामेश्वर देशमुख यांना शौर्यचक्र प्रदान करण्यात आलं. तर सैन्यदलातील प्रवीण जंजाळ यांना मरणोत्तर कीर्ती चक्र प्रदान करण्यात आलं. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, यांच्यासह सैन्य दलांचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**<u>इंधन पुरवठा माहिती</u>**

पश्चिम आशियात अजूनही अशांत स्थिती असताना देखील देशात कच्चे तेल, एलपीजी आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा स्थिर असल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं म्हटलं आहे. देशात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा असल्याचं पेट्रोलियम खात्याचे अतिरिक्त सचिव प्रवीण खनुजा यांनी सांगितलं. नवी दिल्लीत काल झालेल्या आंतर मंत्रालयीन पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या व्यतिरिक्त देशात खतांची एकंदर स्थितीही समाधानकारक असून सध्या खत साठाही पुरेशा प्रमाणात आहे, अशी माहिती रसायने आणि खते विभागाच्या अतिरिक्त सचिव अपर्णा शर्मा यांनी यावेळी दिली.

**<u>इंडी बैठक</u>**

देशातील प्रमुख विरोधी पक्षांच्या इंडी आघाडी या गटाची बैठक काल नवी दिल्ली इथं झाली. विविध विरोधी पक्षांचे प्रमुख नेते या बैठकीला उपस्थित होते. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेसचे वरिष्ठ नेते, सोनिया गांधी, राहुल गांधी, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव, तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष ममता बॅनर्जी, राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे, नॅशनल कॉन्फरन्सचे नेते उमर अब्दुल्ला इत्यादी नेत्यांचा त्यामध्ये समावेश होता. राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे या बैठकीत दूरस्थ प्रणालीद्वारे सहभागी झाले. या बैठकीत विविध मुद्द्यांवर चर्चा झाली, घटक पक्षांची दर दोन महिन्यांनी एकत्रित बैठक घेण्यावर सहमती झाली. त्यानुसार पुढील बैठक ऑगस्टमध्ये हैदराबादमध्ये होईल, असं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी बैठकीनंतर पत्रकार परिषदेत सांगितलं.

**महारेल कामे मंजुरी**

'महाराष्ट्र रेल्वे पायाभूत सुविधा विकास महामंडळ' अर्थात महारेलमार्फत करण्यात येणार असलेल्या एकंदर 131 कामापैकी पहिल्या टप्प्यातील 65 कामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत काल मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र रेल्वे फाटकमुक्त होण्यासाठी पायाभूत सुविधा उभारण्यात याव्यात, असे निर्देशही फडणवीस यांनी दिले. राज्यातील सार्वजनिक बांधकाम आणि नगरविकास विभागाच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांवर रेल्वे उड्डाण पूल, पादचारी पूल आणि रेल्वे मार्गाखालील रस्त्याची कामे महारेलमार्फत करण्यात येणार आहेत. त्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

**धारावी**

सिंगापूर आणि हाँगकाँगमधील आधुनिक गृहनिर्माण प्रकल्पांच्या धर्तीवर धारावीचा पुनर्विकास करावा आणि ठरलेल्या कालावधीतच प्रकल्प पूर्ण करण्याचं नियोजन करावं, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. या संदर्भात झालेल्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते. पुनर्विकास प्रकल्प राबवताना धारावीतील नागरिक, त्यांची उपजीविका आणि स्थानिक वैशिष्ट्ये यांना केंद्रस्थानी ठेवावं, अशी सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केली.

**जैन अर्ज**

राज्यसभेच्या महाराष्ट्रातल्या रिक्त झालेल्या एका जागेसाठीच्या पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेंद्र जैन यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राज्यसभा सदस्यात्वाचा राजीनामा दिल्यानं ही जागा रिक्त झाली होती. यावेळी खासदार प्रफुल पटेल, पार्थ पवार, सुनील तटकरे, छगन भुजबळ तसचं भाजपा नेते आशीष शेलार आणि शिवसेना नेते भरत गोगावले उपस्थित होते. उमेदवारी अर्ज भरण्याचा काल शेवटचा दिवस होता. आज अर्जाची छाननी होईल. दरम्यान, पोटनिवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडून उमेदवार दिला गेला नसल्यानं जैन यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

**ग्लोबल दिंडी-सोलापूर**

यंदाच्या आषाढी वारीत पहिल्यांदाच लंडनहून निघालेली ग्लोबल दिंडी सहभागी होणार आहे. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधिकडून....

**यंदाच्या आषाढी सोहळ्याला अकरा देशाचा प्रवास करून पन्नास दिवसानंतर लंडनहून ग्लोबल दिंडी पंढरपुरात दाखल होणार आहे. लंडन येथील भारतीय अनिल खेडकर यांनी या दिंडी सोहळ्याचे नियोजन केले आहे. लंडन, नेदरलँड, बेरियन, फ्रान्स, जर्मनी, पोलंड, तुर्की, जॉर्जिया अशा अकरा देशाचा प्रवास करून ही ग्लोबल दिंडी पंचवीस जूनला पंढरपुरात दाखल होणार आहे. यामध्ये धोतर कुर्ता गांधी टोपी घालून शेकडो पुरुष तर नऊवारी साडी घालून शेकडो महिला भाविक भक्त टाळ मृदुंग आणि भगवी पताका खांद्यावर घेऊन पंढरपूरसाठी रवाना झाले आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी महेश पांढरे सोलापूर.**

**पुणेरी त्रिकुट**

पुण्यातील तीन विद्यार्थिनींनी अमेरिकेत आयोजित करण्यात आलेल्या 'डिझाइन टू फिफ्टी चॅलेंज' स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विधी डबीर, इंद्रायणी पिसे आणि आध्या सहानी या विद्यार्थिनींनी भारतीय वंशाच्या अंतराळवीर कल्पना चावला यांच्या जीवनावर आधारित सादरीकरण करून स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकावला. याबाबत आकाशवाणीशी बोलताना इंद्रायणी पिसे म्हणाली.....

**मी आणि माझ्या दोन मैत्रिणी विधी डबीर आणि अध्या सहानी ही अमेरिका टू फिफ्टी डिझाईन चॅलेंजच्या स्पर्धेमध्ये भाग घेतला होता. प्रोजेक्ट कोणावर करायचा हे डिसाईड करताना आम्हाला कल्पना चावलेचे नाव दिसले, आणि मग आम्ही तिघींनी तिचंच नाव बघून तिची स्टोरी करायचे ठरवलं. ही स्पर्धा खूप चॅलेंजिंग होती आम्ही पहिल्या राउंडमध्ये एक ग्राफिक नॉवेल बनवलं दुसऱ्या राउंडमध्ये आम्ही एक फिंगर पपेट बनवला. आणि तीसऱ्या राउंड मध्ये आम्ही तिच्याबद्दल एक शॉर्ट फिल्म पण बनवली. ही स्पर्धा नॅशनल हेरिटेज सेंटर चट्टानूगा आणि नासा ने आयोजित केली होती. त्या जजेसना आमचा प्रोजेक्ट खूप आवडला. आम्ही आमचा ग्राफिक नोव्हेल ला पुस्तकासारखं प्रिंट करून कल्पना चावलाच्या घरी हरियानाला पाठवणार आहोत. ह्या स्पर्धेची जज आणि अमेरिकेची रिटायर्ड लष्कर जनरल बी बी बेल ह्यांनी आम्हाला तिघींना पत्र लिहून कळवलं तेव्हा आम्हाला खूप आनंद झाला.**

**<u>नीट परीक्षा केंद्रं-मुंबई</u>**

येत्या 21 जून रोजी होणाऱ्या नीट-यूजी फेरपरीक्षेसाठी केंद्रांची यादी जाहीर झाली आहे. ही परीक्षा देशातल्या 551 केंद्रांवर दुपारी 2 ते सव्वा पाच या वेळात लेखी पद्धतीनं होणार असून परदेशातल्या 14 शहरांमध्येही होणार आहे. प्रवेशपत्र आणि इतर माहितीसाठी विद्यार्थ्यांनी अधिकृत संकेतस्थळाशी संपर्क साधावा असं आवाहन एनटीएनं केलं आहे.

**<u>आंदोलन-नागपूर</u>**

शेतकऱ्यांच्या विविध मागण्या, वाढती महागाई तसंच पेट्रोल-डीझेलच्या दरवाढीच्या निषेधार्थ विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या वतीने काल नागपूरात रस्ता रोको आंदोलन करण्यात आलं. यावेळी आंदोलकांनी हातात विविध मागण्यांचे फलक घेऊन सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

**<u>चित्रपट महामंडळ-कोल्हापूर,मुंबई</u>**

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीत निर्माते मेघराज राजेभोसले यांच्या समर्थ पॅनेलने विरोधी चित्रकर्मी पॅनेलवर दणदणीत विजय मिळवला. महामंडळाच्या 17 जागांसाठी झालेल्या तीन जागांवर बिनविरोध निवड झाली; अन्य सर्व 14 जागा जिंकत राजेभोसले यांनी महामंडळावरील वर्चस्व पुन्हा एकदा कायम ठेवले. अभिनेत्री वर्षा उसगावकर, संकलक विजय खोचीकर आणि गायक आनंद शिंदे हे बिनविरोध निवडून आले.

**<u>गिरीप्रेमी</u>**

गिरीप्रेमी संस्थेच्या 2026 च्या एव्हरेस्ट मोहिमेतील यशस्वी गिर्यारोहकांचा नागरी सत्कार नुकताच पुण्यात उत्साहात पार पडला. ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे यांच्या नेतृत्वाखाली एव्हरेस्ट शिखराची यशस्वी चढाई करणारे युवा गिर्यारोहक अखिल काटकर, मिहिर जाधव, विवेक शिवदे आणि  सहभागी सदस्य निकुंज शाह यांच्या उल्लेखनीय कामगिरीचा यावेळी गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, यांच्यासह गिर्यारोहक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

**<u>क्रिकेट</u>**

न्यू चंडीगड इथं झालेल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतानं काल तिसऱ्याच दिवशी अफगाणिस्तानवर 300 धावांनी विजय मिळवला. भारतानं कर्णधार शुभमन गिलच्या 126, के एल राहुलच्या 100, साई सुदर्शन आणि ऋषभ पंत यांच्या प्रत्येकी 81, आणि वॉशिंग्टन सुंदरच्या नाबाद 52 धावांच्या जोरावर 8 बाद 564 धावांवर पहिला डाव घोषित केला होता. या धावसंख्येचा पाठलाग करताना अफगाणिस्तानचा पहिला डाव काल 152 धावांवर आटोपला. त्यानंतर भारतानं त्यांना फॉलोऑन दिला. मात्र अफगाणिस्तानला दुसऱ्या डावातही चांगली कामगिरी करता आली नाही, 36व्या

षटकातच त्यांचा संघ 112 धावात गारद झाला. मानव सुतारनं पदार्पणातच सामन्यात 7 बळी घेतले. त्याला सामनावीर घोषित करण्यात आलं.

**<u>पाणी पुरवठा</u>**

पुण्याला पाणी पुरवठा करणाऱ्या प्रमुख धरणातील पाणीसाठयात घट झाल्याने पुढच्या आठवड्यापासून पाणी कपात करण्याचा  निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी माहिती महापौर मंजुषा नागपुरे यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. पाणी बचतीसाठी पुण्यात मोहीम राबवली जाणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<u>हवामान-रत्नागिरी</u>**

रत्नागिरी जिल्ह्यातील बहुतेक सर्वच तालुक्यांमध्ये पावसाने हजेरी लावली आहे. जालना शहरासह जिल्ह्याच्या काही भागातही काल रात्री जोरदार पाऊस पडला. दरम्यान नैऋत्य मोसमी पावसाची राज्यात वेगानं आगेकूच सुरू आहे. येत्या 2-3 दिवसात राज्याच्या विविध भागात वीजांसह पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.